ePaper

राज्यपालनियुक्त 12 आमदारांची यादी तयार, मात्र शिंदे गटाला मिळणार तीनच जागा?



| वर्ष - 6 | अंक - 132 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 19 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## प्रशासकीय मनमानीचे 'पाटीलकी'अन् खासदार बारणेंचा 'एक घाव दोन तुकडे'

# आयुक्त बदली प्रकरणात 'बारणे पॅटर्न'!

## मावळते आयुक्त राजेश पाटील यांच्या बदलीसाठी बारणेंचा दबाव




**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

राज्यातील सत्ताबदलानंतर पिंपरी-चिंचवडच्या राजकीय पटलावरील समीकरणेही बदलली. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात मावळते आयुक्त राजेश पाटील यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थानिक नेत्यांनी कारभार चालवला. प्रशासकीय मनमानी आणि राजकीय हस्तक्षेप पाटील यांना भोवला. त्यांनी भाजपासह शिवसेनेचाही रोष ओढावून घेतला. अखेर शिंदे-फडणवीस सरकारमध्ये आयुक्तांना तडकाफडकीच्या निर्णयाला सामोरे जावे लागले.

दरम्यान, आयुक्तांच्या बदलीसाठी शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी 'ताकद' वापरले. "महाविकास आघाडीच्या काळात शिवसेनेचे स्थानिक नेते आणि पदाधिकाऱ्यांची कामे होत नाहीत", असे जाहीरपणे बंड पुकारण्याचे धाडस बारणे यांनी दाखवले होते. तसेच, पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदार संघातील विविध प्रश्नांबाबत बारणेंनी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यामध्ये झालेले दप्तर दिरंगाई बारणे यांना रुचली नाही. तसेच, आयुक्त पाटील यांनी खासदार बारणे यांचा फोन दोन-तीनदा घेतला नाही. बारणे आयुक्तांना एखाद्या मुद्यावर भेटायला गेले असता 'पालकमंत्र्यांना विचारुन निर्णय घेवू'असे उत्तर मिळाले. त्यामुळे बारणेंची नाराजी आणखी वाढली होती. या नाराजीचा उद्रेक झाला आणि खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून आणि साताऱ्यातील एका आमदार महोदयांच्या मदतीने आयुक्त पाटील यांच्या बदलीसाठी 'फिल्डिंग'लावल्याचे बोलले जाते.

> **पिंपरी-चिंचवड महापालिकेत दीड वर्षाच्या कारकिर्दीत विविध कारणांनी वादग्रस्त ठरलेल्या मावळते आयुक्त राजेश पाटील यांना ठेकेदार, बिल्डरांशी सलगी भोवली आहे. दोन वर्षात ठोस कोणतेही काम केले नाही.बिल्डरच्या विळख्यात अडकले होते.हाताखालील अधिकारी वसुलीच्या कामात गुंतले होते. त्यामुळेच राजेश पाटील यांची बदली झाली आहे.**
> **-श्रीरंग बारणे,** खासदार, मावळ.

### राजेश पाटील यांची बदली रोखण्यासाठी भाजपाचे अपयशी प्रयत्न?

दरम्यान, मावळते आयुक्त राजेश पाटील यांनी बदलीचा निर्णय आल्यानंतर भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्याकरवी बदली रोखण्याबाबत प्रयत्न केल्याचे सांगण्यात येते. तसेच, भाजपाचे माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके आणि काही माजी नगरसेवक यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाटील यांची बदली रोखण्याबाबत मागणी केली आहे. त्याबाबत काही प्रसारमाध्यमांमध्ये आयुक्त पाटील यांच्या बदलीचा निर्णय 'होल्ड' असे वृत्त प्रसिद्ध झाले. मात्र, राज्य सरकारकडून बदलीबाबत झालेला निर्णय किंवा आदेश रद्द करता येणार नाही किंवा योग्य ठरणार नाही, असा वरिष्ठ पातळीवरुन निरोप आहे. त्यामुळे पाटील यांची बदली रोखण्यासाठी भाजपासह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांचे प्रयत्न कितपत यशस्वी होतात? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### अजित पवार बोले... आणि आयुक्त पाटील चाले...

प्रशासकीय पातळीवर महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात "तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार बोले... आणि आयुक्त पाटील चाले..." अशी स्थिती होती. त्याला अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे आणि जितेंद्र वाघ या दोन बड्या अधिकाऱ्यांची साथ मिळाली. महापालिकेतील पाटील, ढाकणे आणि वाघ असे 'त्रिदेव'राजकीय हस्तक्षेपाला जुमानत नव्हते. अनेक वादग्रस्त निर्णय घेतल्यामुळे सर्वपक्षीय नाराजीचा सूर होता. राज्यातील सत्तेत महाविकास आघाडी असताना सर्व अलबेल राहिले. मात्र, शिंदे- फडणवीस सरकार आल्यानंतर पाटील विरोधी असंतोषाचा उद्रेक झाला. त्यामुळे "आयुक्त बदली करा.."ही मागणी जोर धरु लागली. तसेच, आयुक्त राजेश पाटील यांच्या बदलीनंतर आता अतिरिक्त आयुक्त ढाकणे आणि वाघ यांचाही 'पत्ता कट होईल' अशी चर्चा महापालिका वर्तुळात जोर धरु लागली आहे.

---

# *मावळातील चिमुकलीला न्याय द्या!*

## पावसाळी अधिवेशन : आमदार शेळके यांची विधानसभेत मागणी



**वडगाव मावळ ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

*मावळ तालुक्यातील कोथुर्णे गावात एका ७ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करत तिची हत्या केल्याची दुर्दैवी घटना २ ऑगस्ट रोजी घडली होती. या घटनेतील मुलीला त्वरित न्याय मिळावा यासाठी आमदार सुनिल शेळके यांनी गुरुवारी (दि.१८) विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मावळातील चिमुकलीला न्याय देण्यासाठी हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात सुरू करा व गावा-गावांतील अवैध धंदे बंद करा,अशी मागणी केली आहे.*

*या संदर्भात आमदार शेळके हे विधिमंडळात बोलताना म्हणाले की, मावळातील कोथुर्णे गावात माणुसकीला काळीमा फासणारी दुर्दैवी घटना घडली.या घटनेतील चिमुकलीला जर न्याय द्यायचा असेल तर खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा व त्यासाठी विशेष सरकारी वकिलांची नेमणूक करण्यात यावी.तसेच आरोपीस कठोरात कठोर शिक्षा व्हावी.व पीडित कुटुंबास न्याय द्यावा अशी मागणी केली.*

*या दुर्दैवी घटनेमागचे कारण गावा - गावात सुरू असलेले दारू धंदे देखील आहेत. या दारू धंद्यानी अनेकांची कुटुंबं उध्वस्त झाली आहेत आणि तरी देखील गावात दारू धंदे सुरू राहत असतील तर ते दुर्दैव आहे. आपण देशाचा ७५ वा स्वातंत्र्य दिवस साजरा करत असताना गावा गावांमध्ये लाईट पाणी यासारख्या मूलभूत सुविधा नाहीत. मात्र प्रत्येक गावात दारू धंदे आहेत. जर या दुर्दैवी घटनेतील चिमुकलीला न्याय द्यायचा असेल तर गावा-गावांतील अवैध दारू धंदे पण बंद करावेत,अशी मागणी आमदार शेळके यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.*

*अनेक सामाजिक संस्था व दानशुरांनी पिडीत कुटुंबास आर्थिक मदत केली. मात्र या घटनेला पंधरा दिवस उलटून देखील सरकारने अद्यापपर्यंत कोणतीही मदत केलेली नाही. पण मुख्यमंत्री लवकरच मदत करणार असल्याचे सोशल मीडियावर पाहिले. मात्र ती मदत लवकर कधी होणार, असा सवाल आमदार सुनिल शेळके यांनी यावेळी उपस्थित केला आहे.*

*आमदार शेळके यांच्या वक्तव्य नंतर आमदार अदिती तटकरे यांनी देखील याबाबत वक्तव्य करत शासनाकडून या कुटुंबास महिला बाल कल्याण विभागाच्या अंतर्गत मनोधैर्य योजनेच्या माध्यमातून तातडीची आर्थिक मदत होणे गरजेचे होते. तसेच ही केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा,अन्यथा पीडित कुटुंबावर नैराश्य येते.असे सांगितले.*




# शहरात सतर्कतेचा इशारा ; पोलिसांकडून बंदोबस्तात वाढ!

## संशयित वस्तू किंवा व्यक्ती आढळल्यास त्वरीत पोलीस नियंत्रण कक्षात संपर्क साधण्याचे आवाहन

**पुणे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

रायगड जिल्ह्यात समुद्रकिनारी शस्त्रसाठा असलेली बोट आढळल्यानंतर राज्यातील प्रमुख शहरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून पुणे पोलिसांनी शहरातील महत्वाच्या ठिकाणी नाकाबंदी करुन संशयित वाहनांची तपासणी सुरू केली आहे. संभाव्य घातपाती कारवायांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्त वाढ केली आहे. संशयित वस्तू किंवा व्यक्ती आढळल्यास त्वरीत पोलीस नियंत्रण कक्षात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यावर शस्त्रसाठा असलेली बोट आढळल्यानंतर तटरक्षक दल, राज्य दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) तसेच पोलिसांनी पाहणी केली. बोटीतील शस्त्रसाठा, बोटीची



मालकी आदी बाबतची माहिती उपलब्ध झाली आहे. संभाव्य घातपाती कारवायांच्या पार्श्वभूमीवर मुंबई, पुण्यासह राज्यातील महत्वाच्या शहरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी शहरातील सुरक्षिततेचा आढावा घेऊन पोलीस ठाण्यासह गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. पोलिसांनी गुरुवारी (१८ ऑगस्ट) शहरातील महत्वाचे रस्ते तसेच शहरात येणाऱ्या प्रमुख मार्गांवर नाकाबंदी करुन संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली आहे. दहशतवाद विरोधी पथक, बॉंब शोधक नाशक पथकाकडून शहरातील महत्वाच्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली आहे. संभाव्य घातपातीच्या कारवायांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी संशयास्पद वाहने, व्यक्ती तसेच बेवारस वस्तू सापडल्यास त्वरीत पोलीस नियंत्रण कक्षात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

### अय्याचार व शिवदीक्षाविधी होणार २१ ऑगस्टला

**पिंपरी चिंचवड ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे तपोनुष्ठान पिंपरी चिंचवड येथील चिंचवडे लॉन्स याठिकाणी सुरू आहे. रविवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी चिंचवडे लॉन्स येथे अय्याचार आणि दीक्षा विधी कार्यक्रम संपन्न होणार आहे. दरवर्षीच्या श्रावण महिन्यातील त्यांचे बत्तीसावे तपोनुष्ठान आहे.

यावर्षी या निमित्ताने अनेक धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम घेण्यात येत आहेत. आजपर्यंत हजारो भक्तांनी याचा लाभ घेतला आहे. परमपूज्य काशी जगद्गुरूंच्या दिव्य सान्निध्यात पंचपीठाचे अनेक शिवाचार्य सद्भक्तांना दीक्षा देणार आहेत. या विधीचा सदभक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन तपोनुष्ठान समितीचे महेश स्वामी आणि सहकारी यांनी केले आहे.

# मावळ तालुक्यात सर्वात मोठ्या सार्वजनिक दहीहंडी उत्सवाचे आयोजन!

## मराठी हिंदी मालिकांच्या सृष्टीतील पाच कलाकारांची उपस्थिती

**तळेगाव-दाभाडे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

मावळ तालुक्यातील सर्वात मोठा सार्वजनिक दहीहंडी उत्सव शुक्रवारी (19 ऑगस्ट) तळेगाव स्टेशन विभागात साजरा होणार असून मराठी हिंदी मालिकांच्या सृष्टीतील पाच कलाकारांची उपस्थिती तसेच पुणे, बारामती, ठाणे, नवी मुंबई आणि मुंबईतील नामवंत गोविंदा पथकांचा सहभाग खास आकर्षण असणार आहे.

माजी उपनगराध्यक्ष गणेश मोहनराव काकडे यांच्या पुढाकारातून पाच वर्षांपूर्वी परिसरातील सर्व मंडळांनी एकत्रितपणे दहीहंडी उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.



कोविड काळात दोन्ही वर्षे असा कार्यक्रम न झाल्याने यंदा तो अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न असल्याचे सार्वजनिक दहीहंडी उत्सव समितीचे अध्यक्ष शेखर मुद्दे, संतोष मोरे आणि ॲड. संविद पाटील यांनी महाईन्यूजला सांगितले.

तळेगाव स्टेशन परिसरातील नगरपालिकेच्या संत ज्ञानेश्वर प्राथमिक शाळेच्या मैदानावर होणाऱ्या दहीहंडीच्या कार्यक्रमासाठी अमिषा पटेल, पूजा बिरारी, शरयू सोनवणे, समृद्धी केळकर या अभिनेत्री तसेच आर जे शोनाली आणि अभिनेता विजय आंदळकर उपस्थित राहणार आहेत. बक्षिसांची एकूण रक्कम 7 लाख 77 हजार 777 इतकी असून महिला गोविंदा पथकाच्या विजेत्यांचा विशेष सन्मानही करण्यात येणार असल्याचे मुख्य संयोजक संतोष मोरे आणि आशिष खांडगे यांनी सांगितले.

### भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश

# न्यायालयासाठी 105 कोटींच्या निधीचा अखेर मार्ग मोकळा!

## मुंबईतील मंत्रालय उच्चाधिकार सचिवांच्या बैठकीत सहमती

**पिंपरी। ।**
**महाईन्यूज ।प्रतिनिधी।**




औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडमधील बहुप्रतिक्षीत न्यायालयाच्या इमारत उभारणीला आता गती मिळणार आहे. राज्य सरकारच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार सचिवांच्या बैठकीत न्यायालयाच्या इमारतीसाठी १०५. ७७ कोटी रुपयांच्या निधीला सहमती दर्शवतील आहे. आता अर्थसंकल्पामध्ये तशी तरतूद करण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी दिली.

मोरवाडी येथील न्यायालयाच्या इमारतीमध्ये फौजदारी व दिवाणी न्यायालयाचे कामकाज चालते. मात्र, वाढत्या खटल्यांची संख्या आणि वकील, अशिलांच्या सुविधांसाठी न्यायालयाच्या इमारतीचा विस्तार करण्याचा प्रस्ताव होता. त्यासाठी मोशी- बोऱ्हाडेवाडी येथील प्राधिकरणाच्या पेठ क्रमांक १४ मध्ये १६ एकर जागा देण्याचे २०११ मध्ये निश्चित करण्यात आले होते. या जागेवर न्यायालयाची नऊ मजली इमारत व न्यायाधीश राहण्याची व्यवस्था असणार आहे. त्यासाठीचा बांधकाम नकाशाही मंजूर आहे. मात्र, जागा हस्तांतरण आणि राजकीय इच्छाशक्तीअभावी न्यायालयाच्या इमारतीचे काम रखडले होते.

दरम्यान, २०१४ मध्ये आमदार महेश लांडगे यांनी विधानसभेत प्रवेश केल्यानंतर न्यायालय इमारतीच्या कामासाठी पाठपुरावा सुरू केला. २०१७ मध्ये महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर जागा हस्तांतरण आणि निधीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. तसेच, पावसाळी आणि हिवाळी अधिवेशनामध्ये आमदार लांडगे यांनी वेळोवेळी न्यायालयाच्या इमारतीसाठी राज्य सरकारचे लक्ष वेधले.

२०१९ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता स्थापन झाली. त्यामुळे पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या प्रस्तावित इमारतीच्या काम रखडले. पिंपरी-चिंचवड बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका प्रशासन आणि राज्य सरकारकडे वारंवार पाठपुरावा करुनही न्यायालयासाठी निधीची उपलब्धता झाली नाही. शिंदे-फडणवीस सत्ता स्थापन झाल्यानंतर पुन्हा आमदार लांडगे यांनी न्यायालयाचया इमारतीसाठी पाठपुरावा सुरू केला.

### शिंदे-फडणवीस सरकारचे शहराला 'पहिले गिफ्ट'

आमदार महेश लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्य सचिवांच्या उच्चाधिकार समितीमध्ये पिंपरी न्यायालयाच्या प्रस्तावित इमारतीबाबत चर्चा करण्यात आली. त्यावेळी चर्चेअंती १०५. ७७ कोटी रुपयांचा अंदाजित निधी मंजूर करण्यासाठी या समितीने सहमती दर्शवली आहे. आगामी अर्थसंकल्पात तशी तरतूद करुन इमारतीच्या कामाला गती देण्यात येणार आहे. गेल्या अडीच वर्षांपासून रखडेल्या न्यायालयाच्या कामाला आता संजीवनी मिळाली असून, लवकरचन्यायालयाचे कामकाजही सुरू होईल, अशी अपेक्षा आहे. शिंदे- फडणवीस सरकारच्या काळात पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी न्यायालयाच्या इमारतीच्या कामाला गती मिळाली. आता यापुढील काळात पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक प्रलंबित विषय मार्गी लागतील, असा आम्हाला विश्वास आहे.

### बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा पाठपुरावा...

पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे मागणी करण्यात आली होती. आमदार लांडगे यांच्याकडेही निधीबाबत निवेदन देण्यात आले होते. आता राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यामुळे एकूण २४१८२.५६ चौरस फूट क्षेत्रफळाची इमारतीचे काम मार्गी लागले आहे. या इमारतीच्या कामासाठी शासकीय वास्तुविशारदांकउन नकाशे तयार केले आहेत. २०२१-२२ च्या दरसूचीनुसार काम प्रस्तावित असून, उच्चाधिकार समितीने १०५.५५ कोटी रुपयांच्या निधीला सहमती दर्शवली आहे. यासाठी बार असोसिएशनचेअध्यक्ष ॲॅड. सचिन थोपटे, महाराष्ट्र आणि गोवा नोटरी अध्यक्ष ॲॅड. अतिष लांडगे ,बारचे उपाध्यक्ष ॲॅड गौरव वाळुंज, ऑडिटर ॲॅड गोरख मकासरे आदी पदाधिकाऱ्यांनी योगदान दिले आहे.

---

### आमदार महेश लांडगे 'इफेक्ट'

# पुणे जिल्ह्यातील ग्रामीण पीएमपीएमएल बससेवा होणार पूर्ववत !

## येत्या ऑगस्टअखेर पीएमपीएमएल बसचे मार्ग पुन्हा सुरू, विद्यार्थी, नोकरदार, चाकरमानी यांना मिळाला दिलासा

**पिंपरी ।**
**महाईन्यूज ।प्रतिनिधी।**





भोसरी ते घोडेगाव, भोसरी ते मंचर, भोसरी ते कडूस आणि भोसरी ते जुन्नर या सर्व मार्गावरील पीएमपीएमएल बस सेवा पूर्ववत सुरु करण्यात येत आहे. ऑगस्ट महिनाअखेरपासून या गाड्या सुरू करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष आणि भोसरी विधानसभा आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला होता. एसटी कामगारांचा संप झाल्यानंतर ग्रामीण भागात पीएमपीएमएल प्रशासनाने बस सेवा सुरू केली. यानंतर ग्रामीण हद्दीतील सुमारे १३ नवे मार्ग सुरू करण्यात आले. यामध्ये भोसरी ते घोडेगाव, भोसरी ते मंचर, भोसरी ते कडूस आणि भोसरी ते जुन्नर आदी मार्ग सुरू करण्यात आले . मात्र, हे मार्ग सुरू केल्यानंतर दोनच महिन्यात कोणतेही कारण न देता प्रशासनाने बस सुविधा बंद केली. यामुळे प्रवाशांची मोठी अडचण होत होती. या भांगामध्ये सध्यातरी कोणतेही उद्योग व्यवसाय मोठ्या प्रमाणात नाही. या भागातील सुशिक्षित तरुण तसेच आयटीआय झालेले तरुण नोकरीनिमित्त भोसरी, आळंदी, खेड, तळेगाव, चाकण यासारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये नोकरीनिमित्त दररोज ये-जा करतात.

याशिवाय या ग्रामीण भागातील अनेक तरुण प्रशिक्षण, कोचिंग क्लास यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये येत असतात. त्यांना ग्रामीण भागातून ये - जा करण्यासाठी सार्वजनिक बस सेवा पुरेशा प्रमाणात नाही. त्यामुळे 'पीएमपीएमएल'च्या या ग्रामीण भागात सुरू झालेल्या बस सेवेमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळत होता. मात्र ही बस देखील बंद झाल्याने पुन्हा एकदा नागरिकांच्या प्रवासाचा प्रश्न निर्माण झाला होता. तसेच, ग्रामीण भागात ज्या बस चालू होत्या. त्यावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने आक्षेप घेतला होता. याबाबत प्रवाशांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे तक्रारी केल्या. तसेच हे मार्ग सुरु करण्याची मागणी केली. या पार्श्वभूमीवर आमदार लांडगे यांनी पाठपुरावा केला. भोसरीमधून जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर या परिसरातील नागरिक, विद्यार्थी, कामगार वर्ग यांना जोडणाऱ्या पीएमपीची बस सेवा तात्काळ सुरु करण्यासाठी पीएमपी प्रशासनाला निवेदन दिले होते.

> **भोसरीहून मंचर, कडूस, घोडेगाव, जुन्नर हे मार्ग बंद करण्यात आले. यामुळे प्रवाशांची मोठी अडचण होत होती. ही बाब पीएमपीएमएल प्रशासनाच्या लक्षात आणून दिली. ग्रामीण भागातील नागरिकांना शहरात येण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे ही काळाची गरज आहे. ऑगस्ट महिनाअखेरपासून या गाड्या सुरू करण्याचे नियोजन आहे. प्रशासनाने घेतलेल्या सकारात्मक निर्णयाबाबत समाधान व्यक्त करतो. मात्र, भोसरी ते शिवभूमी शिवनेरी बससेवा केव्हाच बंद न करता कायमस्वरूपी चालूच राहिली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान आणि अखंड महाराष्ट्राचे हृदयस्थान असलेल्या या मार्गावर सार्वजनिक बस सेवा ठेवली पाहिजे, अशा सूचनाही आम्ही प्रशासनाला दिल्या आहेत.**
>
> **- महेश लांडगे,** शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## संपादकीय »

# वास्तव 'महाशक्ती'चे !

***महाराष्ट्रातील सत्तांतरानंतर चाळीस दिवसांनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सरकारच्या दिमतीला मंत्री मिळाले होते आणि आता या सरकारचे खातेवाटपही झाले आहे!***

मात्र, या खातेवाटपात फडणवीस यांनी मारलेल्या बाजीनंतर शिवसेनेतून बाहेर पडलेल्या या ४० जणांच्या हाती मुख्यमंत्री पदाशिवाय आले तरी काय, असा प्रश्न समोर येतो. खातेवाटपावर भारतीय जनता पक्षाचा वरचष्मा दिसतो. शिवाय, शपथविधी सोहळ्यात मंत्र्यांचा जो काही क्रम लावण्यात आला होता, त्यावर नजर टाकली तर फडणवीस यांचे प्रदेश भाजपवरील अधिराज्य ठळकपणे समोर येते. मुख्यमंत्रिपद भले शिंदे गटाकडे गेले असले, तरी सरकारवर फडणवीस नि भाजप यांची मोठी छाप आहे. भाजपचे स्वतःचेच १०५ आमदार आहेत, ही बाब खरीच. तरीदेखील खातेवाटप जाहीर झाल्यानंतर आवळा देऊन कोहळा काढणे, या म्हणीची आठवण होते. गुवाहाटीत असताना शिंदे यांनी आमच्या पाठीशी 'महाशक्ती' आहे, असा उल्लेख केला होता.

त्या 'महाशक्ती'चे वास्तव या निमित्ताने त्यांना चांगलेच जाणवले असेल! पूर्वीचीच म्हणजे उद्धव ठाकरे सरकारातील नगरविकास आणि अन्य काही खाती आपल्याकडे राखण्यात मुख्यमंत्री शिंदे यांना यश आले आहे. मात्र, फडणवीस यांच्याकडे अत्यंत महत्त्वाची गृह आणि अर्थ अशी खाती आहेत. ऊर्जा, जलसंपदा आणि गृहनिर्माण अशी कळीची खातीही भाजपकडे आहेत. गृह आणि अर्थ या दोन खात्यांचा एकूणातील व्याप बघता, ही एका अर्थाने फडणवीस यांची कसोटी असली तरी यापूर्वी ही दोन खाती एकाच मंत्र्याकडे सोपवण्याची घटना अपवादानेच घडली असेल. अर्थात, या मंत्रिमंडळाचा विस्तार अजूनही बाकी असून, तो झाल्यावर काही खाती इतरांकडे जाऊ शकतात, असे सांगितले जात आहे. मात्र, आता सत्तारूढ झालेले सर्वच्या सर्व म्हणजे २० मंत्री हे कॅबिनेट दर्जाचे असल्याने या विस्तारात समावेश होणारे बहुतेक मंत्री हे राज्यमंत्रीच असणार, याबाबत शंका नसावी. त्यामुळे फडणवीस यांच्या हातातच गृह तसेच अर्थ ही दोन कळीची खाती कायम राहतील, अशी चिन्हे आहेत.

या खातेवाटपाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पूर्वीच्या महाविकास आघाडी सरकारात जी बलदंड खाती राष्ट्रवादी काँग्रेसकडे होती, त्यांचा कारभार आता भाजपने आपल्या हातात घेतला आहे! महाविकास आघाडी सरकारचे खातेवाटप झाले तेव्हाच आपल्या हाती कमी दर्जाची खाती आल्याची तक्रार शिवसेना आणि मुख्यत्वे काँग्रेसचे नेते खाजगीत करत होते. तीच खाती आता शिंदे गटाला मिळाली आहेत. त्यामुळे या गटातील आमदारांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या नाराजीचा राग आळवणे सुरू केले असले, तरी त्यातून फार काही निष्पन्न होईल, असे वाटत नाही. सत्तांतरानंतर शिंदे यांचे नाव मुख्यमंत्रिदासाठी मुक्रर करण्यात आले, तेव्हा फडणवीस यांनी प्रथम मंत्रिमंडळात सामील न होण्याचा निर्णय जाहीर केला होता.




## जो गंगा का नीर, पिछे पिछे हरी चला, कहत कबीर कबीर

मन, बुद्धी, चित्त, अहंकार हे चार मिळून अंतःकरण चतुष्ट्य होते. आपल्याला देवाने दहा इंद्रिये दिली आहेत. पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये. या दशइंद्रियांचा राजा मन आहे, म्हणून मनाला अंतरेंद्रिय म्हटले आहे. अंतरेंद्रिय याचा अर्थ जे दिसत नाही; पण ज्याची सत्ता सगळ्या ठिकाणी चालते. राजा राजवाड्यात राहतो; पण त्याची सत्ता संपूर्ण राज्यात चालते. तशी राजा म्हणून मनाची सत्ता आपल्या जीवनावर चालते. आपले अंत:करण चतुष्ट्य, म्हणजे आपले सूक्ष्म शरीर आहे. आपल्याला चार देह असतात. त्यापैकी आपला दिसणारा हा स्थूल देह आहे. संत सत्पुरुष हे स्थूल देहाचे सौंदर्य पाहत नाहीत. या बाह्य गोष्टींवर सद्गुरूंचे प्रेम नसते. सद्गुरूंची सौंदर्य पाहण्याची जी दृष्टी असते, ती त्या भक्ताच्या मनावर असते. भक्ताचे मन कसे आहे? ते शुद्ध आहे का? त्या मनामध्ये भाव किती ओतला आहे? ते मन किती भाववाही आहे, यावर सद्गुरू प्रेम करीत असतात. अध्यात्मामध्ये मनाला महत्त्व आहे. ज्याचे मन निर्मळ आहे, त्याला हरी शोधत येतो. कबीरदास म्हणतात,.

# आता कोठे गेला मानवाधिकार?




सलमान रश्दींवर झालेल्या हल्ल्यानंतर उमटलले जागतिक पडसाद नीट पाहिले तर एरवी अभिव्यक्ती स्वातंत्र्य, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य यावर बोलघेवडेपणा करणारी मंडळी गप्प असल्याचे दिसते. एरवी भारताला सहिष्णुतेचे धडे देणारी अमेरिकी प्रसारमाध्यमेही बऱ्याच अंशी शांत आहेत. हे सगळे कोणत्या मानसिकतेतून घडते?

प्रसिद्ध लेखक सलमान रश्दी यांच्यावर गेल्या शुक्रवारी प्राणघातक हल्ला झाला. त्या हल्ल्यात झालेल्या जीवघेण्या जखमांमधून ७५ वर्षांचे रश्दी सुखरूप बाहेर येत आहेत, असे सध्याच्या बातम्यांवरून दिसते आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क शहराच्या पश्चिम भागात एका कार्यक्रमात ते सहभागी झाले असताना हा हल्ला झाला. भर सभागृहात, मंचावर बसलेल्या रश्दींवर एका तरुणाने



अनेक वार करून त्यांना जखमी केले. त्यांना ठार मारण्याच्या हेतूनेच हा हल्ला केला गेला होता. रश्दी यांनी ३४ वर्षांपूर्वी, १९८८मध्ये लिहिलेल्या SATANIC VERSES ह्या पुस्तकाबद्दल त्यांना ठार मारण्याचा फतवा इराणी मुस्लिम धर्मगुरू अयातुल्ला खोमेनीने जारी केला होता. जो रश्दी यांना ठार मारेल, त्याला ३० लाख डॉलर इनाम देण्याचीही घोषणा तेव्हा केली गेली होती. त्या फतव्याला आणि अयातुल्ला खोमेनी मरण पावल्यालाही आता ३३ वर्षे होऊन गेली. त्यानंतर हा हल्ला झाला आहे. हल्ला करणारा तरूण त्यावेळी जन्मालाही आलेला नव्हता. आज तो केवळ २४-२५ वर्षांचा आहे. म्हणजे ज्यावेळी हा विवाद निर्माण झाला होता, त्यावेळचे काहीही त्याला स्वत:ला माहिती नाही. तरीही त्याने हे अमानवी कृत्य केले आहे. ही मानसिकता कशातून निर्माण होते? ती तयार करण्याची कोणती व्यवस्था, यंत्रणा आहे? ती चालवणारे कोण आहेत? तिची कार्यपद्धती काय आहे? हे सगळे महत्त्वाचे प्रश्न आहेत. पण त्यांची चर्चा इथे करण्याचा माझा इरादा नाही.

मला पडणारे प्रश्न वेगळे आहेत. सलमान रश्दी जन्माने भारतीय असले तरी गेली अनेक दशके ते ब्रिटन-अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. १९८८मध्ये त्यांच्या SATANIC VERSES ह्या पुस्तकावर बंदी घालणारा भारत हा पहिला देश होता. प्रचंड बहुमत असलेली काँग्रेस त्यावेळेला सत्तेवर होती व राजीव गांधी पंतप्रधान होते. जनता दलाचे तेव्हाचे सरचिटणीस सय्यद शहाबुद्दीन यांनी त्या पुस्तकावर बंदी घालण्यासाठी मोहीम सुरु केली होती. तिला प्रतिसाद देऊन राजीव गांधींनी त्या पुस्तकावर बंदी घालून टाकली. जेव्हा आपल्याकडे त्या पुस्तकावर बंदी घातली तेव्हा ते पुस्तक प्रकाशित झाले नव्हते, त्यामुळे बंदीची मागणी करणारे व बंदी घालणारे यांच्यापैकी कोणीही ते वाचले नव्हते. आजही त्या पुस्तकाबद्दल रश्दींवर आगपाखड करणाऱ्या कोणी ते पुस्तक वाचले असण्याची शक्यता नाही. मी स्वत: ते वाचलेले नाही. त्यांची अन्य काही पुस्तके मी वाचली आहेत. लेखक म्हणून ते काही फार महान आहेत, असे मला कधी वाटलेले नाही. तरीसुद्धा पुस्तकावर बंदी घातली गेली, हे काही मला योग्य वाटले नव्हते. पण आपले पहिले पंतप्रधान पं.नेहरूंपासून पुस्तकांवर बंदी घालण्याची एक भली मोठी परंपरा आपल्याकडे आहे.

# ड्रॅगनची चौथी आघाडी

**भारताचा अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन पार पडावा आणि त्याच वेळी चीनचे 'युआन वांग-५' हे खरे तर नौदलाच्या ताफ्यातले; पण चीनच्या दाव्यानुसार वैज्ञानिक संशोधन करणारे जहाज श्रीलंकेच्या हंबनटोटा बंदरात दाखल व्हावे, हा योगायोग नाही.**

तैवानप्रश्नी आपले मौन सोडून भारताने नुकतेच 'सध्याची परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न कोणी करू नये,' असे म्हटले तर चीनचा निषेध करणारे व म्हटले तर अतिशय सावध असे निवेदन प्रसिद्धीस दिले होते. हे निवेदन परराष्ट्र खात्याने काढले, तेव्हा युआन वांगचा प्रवास सुरू झालाच होता. जागतिक मीडियात असे म्हटले जाते, की चीनने हे जहाज थोडे विलंबाने हंबनटोटा बंदरात नांगरावे, अशी विनंती करण्यात आली होती. या विनंतीचे कारण समजण्यासारखे आहे. श्रीलंकेला भारताने अलीकडेच टेहळणी करण्यासाठी एक विमान भेट दिले आहे.

भारत-श्रीलंका यांच्या दरम्यान चोरटा व्यापार, निर्वासितांची हालचाल होऊ नये, यासाठी या विमानाचा वापर होऊ शकतो. श्रीलंका आर्थिक नष्टचर्यात सापडल्यापासून भारताने विविध मार्गांनी किमान तीस हजार कोटी रुपयांची मदत केली आहे. आणखीही मदत केली जाणार आहे; तरीही श्रीलंका चीनला तुमचे तथाकथित वैज्ञानिक जहाज आमच्या सागरी हद्दीत आणू नका, असे म्हणू शकली नाही. कोट्यवधी डॉलर खर्ची करून हेच हंबनटोटा बंदर चीनने विकसित करून दिले होते. कर्जबाजारी श्रीलंका या खर्चाची परतफेड करू न शकल्याने, या बंदराची मालकी आधीच चीनकडे गेली आहे; मात्र याचा अर्थ या बंदराचा लष्करी वापर चीनने करावा, असे नाही. ते सगळ्या जागतिक कायद्यांच्याही विरोधात जाणारे आहे. चीनच्या मते हे लष्करी जहाज नाहीच. या जहाजावर प्रत्यक्ष शस्त्रे व क्षेपणास्त्रे नसली, तरी त्याच्यावर अत्यंत शक्तिशाली संवेदक, म्हणजे सेन्सर आहेत. भारताच्या किनारी संरक्षणाची आणि इतरही बरीच माहिती ते टिपू शकतात. भारतीय उपग्रह आणि सैन्यदले यांचे संदेशवहन टिपण्याचाही प्रयत्न नक्कीच होणार. युआन वांगने हंबनटोटा बंदरात नांगर टाकणे, ही भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने चिंताजनक घटना आहे. वेगवेगळ्या मिषाने श्रीलंकेचा असा वापर चीनने वाढवला, तर ती आपल्याला कायमची डोकेदुखी ठरू शकते.

आज चीनने भारताच्या पश्चिम सीमेवर पाकिस्तान; तसेच अप्रत्यक्षपणे दहशतवादी संघटनांना हाताशी धरून पुष्कळ कटकटी चालविल्या आहेत. उत्तर सीमेवर तर चीनशी आपला उघडच संघर्ष चालू आहे. तो असाच दीर्घ काळ चालत राहणार आहे. भारताच्या पूर्वेकडे नेपाळ, भूतान, बांगलादेश आणि म्यानमार या खरे तर भारताच्या मित्रदेशांना फितवून, त्यांच्यावर मदतीचा वर्षाव करून चीनने जाळे फेकायला बऱ्याच आधी आरंभ केला आहे. गेल्या काही वर्षांतील या छोट्या देशांमधील सत्ताधाऱ्यांनी भारताशी बोलताना अनेकदा जो चढा स्वर लावला, त्यामागचे इंगित हेच आहे. श्रीलंकेतील चीनची चबढब अलीकडे वाढली असली, तरी प्रत्यक्ष धोका थोडा दूर होता. तो आता वास्तवात आला आहे. करोनाचा प्रादुर्भाव सुरू झाल्यानंतर भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार देशांचा 'क्वाड' हा राष्ट्रसमूह खूपच क्रियाशील झाला.

## ।। अभंगवाणी ।।



दुर्जनासि करी साहे ।
तो ही दंड हे लाहे ॥१॥
शिंदळीच्या कुंटणी वाटा ।
संग खोटा खोट्याचा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुंबई-गोवा महामार्गाचे काम डिसेंबर 2023 पर्यंत पूर्णत्वास!

## गणेशोत्सवापूर्वी महामार्ग खड्डेमुक्त करण्याची बांधकाम मंत्र्यांची ग्वाही

।मुंबई ।महाईन्यूज ।

**गेल्या एक तपापासून रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण केले जाईल. तसेच गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या नागरिकांच्या सुखकर प्रवासासाठी २५ आगस्टपूर्वी हा महामार्ग खड्डेमुक्त करण्यात येईल, अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी गुरुवारी विधानसभेत दिली.**



### दहा वर्षांत दीड हजार बळी

गेल्या १२ वर्षांपासून या महामार्गाचे काम रखडले आहे. या महामार्गावर दहा वर्षांत ६,६९२ अपघात झाले असून, १५१२ जणांचे बळी गेले आहेत. त्यामुळे या महामार्गाचे काम कधी पूर्ण होणार, याकडे कोकणवासीयांचे लक्ष लागले आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामाबद्दल सुनील प्रभू, शेखर निकम, जितेंद्र आव्हाड आदींनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान चव्हाण यांनी या महामार्गाचे काम रखडले, ही वस्तुस्थिती असल्याचे मान्य केले. भूसंपादनासाठी लागलेला कालावधी आणि इतर अनेक कारणांमुळे येथील काम संथगतीने सुरू आहे. मात्र, महामार्गाचे काम तातडीने पूर्ण व्हावे, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. परशुराम घाटाचे रखडलेले काम मे २०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बारा वर्षे होऊनही या महामार्गाचे काम का पूर्ण झाले नाही, अशी विचारणा यावेळी सदस्यांकडून करण्यात आली. तसेच कशेडी, रायगड घाटातील कामही अत्यंत धीम्या गतीने सुरू असून, येथील कामांमुळे आजूबाजूच्या गावांना धोका असल्याने त्याबाबत काय उपाययोजना करणार, अशी विचारणाही यावेळी करण्यात आली.

या महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत, ही वस्तुस्थिती असल्याची कबुली यावेळी चव्हाण यांनी दिली. अनेक अडचणींवर मात करीत संथगतीने हे काम सुरू आहे. येणारा गणेशोत्सव हा महत्त्वाचा सण लक्षात घेऊन २५ ऑगस्टपर्यंत महामार्ग खड्डेमुक्त केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

कशेडी तसेच परशुराम घाटात दरड कोसळून निर्माण होणारा अडथळा लक्षात घेता घाट परिसरातील मातीचे 'टेरी'कडून परीक्षण केले जात आहे. त्यानंतर 'टेरी'च्या सल्ल्यानुसार या मार्गात उपाययोजना करण्यात येतील, अशी माहितीही त्यांनी दिली.

---

### शॉर्ट न्यूज

#### सहा दशकांनंतर विधिमंडळात काँग्रेसची पाटी प्रथमच कोरी



। मुंबई । । महाईन्यूज ।

राज्यात सर्वाधिक काळ सत्तेवर राहिलेल्या काँग्रेसच्या वाटयाला विधिमंडळातील एकही पद येऊ शकले नाही एवढी नामुष्की पक्षावर आली आहे. संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पहिल्यांदाच काँग्रेसची एवढी वाईट परिस्थिती झाली आहे. राज्यातील यापूर्वीच्या दोन सत्तांतरांनंतरही जनमानसावर मजबूत पकड ठेवलेल्या काँग्रेसची तिसऱ्या सत्तांतरानंतर मात्र क्षीण अवस्था झाली आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक काळ काँग्रेस पक्ष सत्तेत राहिला आहे. १९७८ व १९९५ अशा दोन सत्तांतरांचा काँग्रेसने सामना केला. पुन्हा सत्ता मिळविली. परंतु २०१४ च्या सत्तांतरानंतर पक्षाची विधिमंडळातील ताकद क्षीण झाल्याचे दिसते. तेव्हा विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे होते. परंतु या वेळच्या सत्तांतरात काँग्रेसची पाटी पूर्णपणे कोरी राहिली आहे. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

---

# पंतप्रधानांकडे तक्रार करूनही कोंडी कायम

## नाशिक-मुंबई महामार्गावर वाहनधारक अनेक तास कोंडीत

।नाशिक । महाईन्यूज ।



ठाणे ते मानकोली दरम्यानच्या वाहतूक कोंडीमुळे नाशिक-मुंबई महामार्गावरील प्रवास अतिशय जिकिरीचा ठरत असून कोंडीत वाहने दोन-तीन तास अडकून पडत असल्याने प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. या संदर्भात ॲडव्हान्टेज नाशिक फाऊंडेशन अर्थात 'नाशिक फस्ट'ने पंतप्रधान कार्यालयाकडे दाद मागितली होती. मात्र त्यास प्रतिसाद न मिळाल्याने रखडपट्टी कायम आहे.

ठाणे ते अंजुरफाटा मार्गावरील राजकीय नेत्यांची गोदामे, अवघड वाहनांची वाढती संख्या, भिवंडी वळण रस्त्यावरील बंद टोल नाक्याचा अडथळा आदींचे संदर्भ देत कुठे काय अडचणी येतात याकडे लक्ष वेधले होते. त्यावर राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाने उत्तर दिले. भिवंडी टोल नाका हा वडपे-ठाणे मार्गाच्या विस्तारीकरणात हटविला जाईल. माजीवडा-वडपे हा चार मार्गिकेचा टप्पा आठ मार्गिकेचा करण्याचे काम सुमारे १० वर्षांपासून रेंगाळले आहे. पंतप्रधान कार्यालयाकडे तक्रार करूनही महामार्गावरील स्थितीत सुधारणा न झाल्यामुळे नाशिक फस्टने वाहतूक कोंडी, खड्डे यावरून उच्च न्यायालयात दाद मागण्याचे ठरविले आहे. चारपदरी महामार्गामुळे वेगवान झालेल्या नाशिक-मुंबई प्रवासाला ठाणे, भिवंडी परिसरातील खड्डे आणि प्रचंड वाहतूक कोंडीने करकचून ब्रेक लावला आहे. या मार्गावर दररोज हजारो वाहने ये-जा करतात. नाशिकहून जाणाऱ्या आणि मुंबईहून नाशिकला येणाऱ्यांना ठाणे, भिवंडीचा टप्पा पार करणे अग्निदिव्य ठरले आहे. अलीकडेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या मार्गावरून नाशिकला आले होते. महामार्गाची दुरवस्था पाहून त्यांनी तातडीने दुरुस्तीचे निर्देश दिले होते. तथापि, परिस्थितीत आजही कुठलाही फरक पडलेला नसल्याचे या मार्गावरून दैनंदिन प्रवास करणारे वाहनधारक सांगतात. या मार्गावरील बिकट परिस्थितीबाबत ॲडव्हान्टेज नाशिक फाऊंडेशनने पंतप्रधान कार्यालयाकडे पोर्टलवर तक्रार करून हा प्रश्न सोडविण्याची मागणी केली होती. केंद्र सरकारने या मार्गावरील गोंदे ते वडपे आठ पदरी काँक्रीटचा रस्ता करण्याचे जाहीर केले. त्यासाठी पाच हजार कोटींच्या निधीची घोषणा झाली. अनेक वर्षांपासून रखडलेले हे काम तातडीने पूर्ण करण्याची निकड मांडली गेली.

---

# म्हाडा पुणे मंडळातील ५,२११ घरांची सोडत

## परवडणारी घरे देण्यास सरकार कटिबद्ध : मुख्यमंत्री

।मुंबई ।महाईन्यूज ।

म्हाडाच्या पुणे मंडळातील ५२११ घरांसाठी गुरुवारी सोडत काढण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे सोडत काढण्यात आली. ५२११ घरांसाठी सुमारे ७१ हजार ७४२ अर्ज सादर झाले होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काढण्यात आलेल्या सोडतीतील पहिले विजेते सागर खैरनार ठरले आहेत.

पुणे मंडळाने जुलैमध्ये ५२११ घरांसाठी सोडत जाहीर केली होती. त्यानुसार अर्ज विक्री, स्वीकृती आणि सोडतपूर्व प्रक्रिया पूर्ण करून गुरुवारी सोडत काढण्यात आली. मुळात ही सोडत २९ जुलै रोजी काढण्यात येणार होती. मात्र म्हाडाच्या सोडतीच्या उत्पन्न मर्यादित राज्य सरकारकडून बदल करण्यात आला. त्यामुळे नवीन उत्पन्न मर्यादेसह अर्ज भरून घेणे आवश्यक बनल्याने संगणकीय प्रणालीत तसे बदल करून पुणे मंडळाने जुलैमध्ये अर्जस्वीकृती सुरू केली.

## शॉर्ट न्यूज »

### तरुणीची पावणेदोन लाख रुपयांची फसवणूक

।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।


गुंतवणुकीवर १० ते १५ टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून एका २४ वर्षांच्या तरुणीची सुमारे पावणेदोन लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या तरुणीच्या तक्रारीवरून साकिनाका पोलिसांनी अनोळखी भामट्याविरोधात फसवणुकीसह माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी सायबर सेलचे अधिकारी संमातर तपास करीत आहेत. तक्रारदार तरुणी ही साकिनाका येथील असल्फा गाव परिसरात तिच्या कुटुंबियांसोबत वास्तव्यास असून ती विक्रोळी येथे नोकरी करते. ८ ऑगस्टला ती तिच्या घरी होती. यावेळी तिने इन्स्टाग्रामवर एक नोकरीविषयी जाहिरात पाहिली. घरबसल्या नोकरीद्वारे गुंतवणूक करून १० ते १५ टक्के व्याज मिळावा असे जाहिरातीत नमूद करण्यात आले होते.

मुंबई-दिल्ली द्रुतगती महामार्गाचे 70 टक्के काम पूर्ण

# नरिमन पॉईंट-दिल्ली अवघ्या 12 तासांत प्रवास!

केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची माहिती

मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पर्यायी इंधन उपलब्ध करणार**


प्रदुषणुक्तीसाठी वीजेवर धावणाऱ्या वाहनांकडे कल वाढत असतानाच भविष्यात वाहनांसाठी हायड्रोजन, इथेनॉल आदी पर्यायी इंधनाची व्यवस्था करण्यात येईल. त्यामुळे पेट्रोल, डिझेल हद्दपार होतील. पर्यायी इंधनामुळे खर्च कमी होईल आणि वाढत्या प्रदुषणालाही रोखणे शक्य होईल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारने दिल्ली – मुंबई दरम्यान नवीन द्रुतगती महामार्गाचे काम हाती घेतले असून हा महामार्ग मुंबईतील नरिमन पॉईंटशीही जोडण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. मुंबईत वीजेवर धावणाऱ्या दुमजली वातानुकूलित बसला गुरुवारी हिरवा कंदिल दाखविण्यात आला. यानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमात गडकरी यांनी दिल्ली-मुंबई महामार्गाची माहिती दिली.

या महामार्गाचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून या महामार्गावरून वीजेवर धावणाऱ्या वातानुकूलित बस चालवण्याचे नियोजन असल्याचेही ते म्हणाले. महामार्गाच्या कामाला गती देण्यात येत आहे. सध्या मुंबई-दिल्ली रस्ते मार्गे वाहनानांना १ हजार ४५० किलोमीटर अंतर पार करावे लागते. यासाठी २४ तास लागतो. महामार्ग झाल्यास हा प्रवास बारा तासांत होईल, असे गडकरी यांनी सांगितले. हा महामार्ग नरिमन पॉईंटशी जोडण्याचे नियोजन असून त्यामुळे येथूनही रस्तेमार्गे दिल्लीला बारा तासांत जाता येणे शक्य होईल. गेल्या काही वर्षांत वांद्रे-वरळी सी लिंक, ५५ उड्डाणपूल आणि मुंबई-पुणे महामार्ग अशी अनेक कामे केली. मुंबई-दिल्ली महामार्ग नरिमन पॉईंट, तसेच वांद्रे-वरळी सागरीसेतूला जोडण्याचे नियोजन असल्याचे ते म्हणाले. दिल्ली-चंढीगड, दिल्ली-डेहराडून, दिल्ली-हरिद्वार आदी मार्गाचे काम सुरू असून त्यामुळे या शहरांमधील प्रवास दोन तासांत होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. वीजेवर धावणारी वातानुकूलित दुमजली बस ही मुंबईसाठी वेगळी व चांगली संकल्पना आहे. वाहतूक व्यवस्थेतील हे महत्त्वाचे परिवर्तन आहे, असे गडकरी म्हणाले.

# कर्नाटकात शिक्षण संस्थांमध्ये गणेशोत्सव साजरा करण्यावरून वाद

बंगळूरु । महाईन्यूज । प्रतिनिधी।




कर्नाटकमधील शाळा-महाविद्यालयांमध्ये ३१ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थी साजरी करण्यात यावी, असे वक्तव्य शालेय शिक्षणमंत्री बी. सी. नागेश यांनी केल्याने वाद निर्माण झाला आहे. कर्नाटकातील राज्य सरकार दांभिक असल्याची टीका मुस्लीम समुदायाने केली. मुस्लीम विद्यार्थिनींना शाळा-महाविद्यालयाच्या आवारात हिजाब परिधान करण्यास बंदी घातली जाते, मग गणेश चतुर्थी साजरी करण्यास परवानगी का दिली जाते, असा सवाल विचारला जात आहे.

नागेश यांच्या विधानाचे पडसाद राज्यात उमटले. काही विद्यार्थी संघटनांनी आणि मुस्लीम संघटनांनी त्यांच्यावर टीका केली. "शिक्षणमंत्र्यांनी सरकारी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये गणेशमूर्ती विराजमान करण्यास परवानगी देणे म्हणजे शिक्षण क्षेत्रात अशांतता निर्माण करून राजकीय फायदा मिळवण्याचा प्रयत्न आहे. हे निर्धार्इ आणि लज्जास्पद आहे. गंमत म्हणजे हे तेच मंत्री आहेत, ज्यांनी शिक्षण संस्थांमध्ये धार्मिक प्रथांना परवानगी देता येणार नाही, असे वक्तव्य याआधी केले होते," अशी टीका दी कॅम्पस फ्रंट ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेने केली आहे. एकीकडे गणेशमूर्तीची स्थापना करणे आणि दुसरीकडे इतर समुदायांना त्यांचे धार्मिक विचार व्यक्त करण्यापासून प्रतिबंधित करणे हे अन्यायकारक आहे. शिक्षण संस्थांमध्ये कोणत्याही धार्मिक प्रथा किंवा हिजाबसह कोणत्याही प्रकारच्या धार्मिक अभिव्यक्तीला परवानगी नाही, असे सरकारने यापूर्वीच स्पष्ट केले होते. मग सरकारने गणेशमूर्ती बसविण्यास परवानगी का दिली, त्यामुळे इतर धार्मिक समाजातील विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत का, असा सवाल दी कॅम्पस फ्रंट ऑफ इंडियाचे सदस्य सईद मुईन यांनी विचारला.

# काबूलमध्ये मशिदीत भीषण बॉम्बस्फोट

। कोलंबो । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**20 जणांचा मृत्यू तर 40 जखमी**



अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील एका मशिदीत बॉम्बस्फोट झाला. या स्फोटात २० जणांचा मृत्यू तर ४० जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये ५ लहान मुलांचा समावेश आहे. काबूलच्या पीडी १७ येथील मशिदीत बॉम्बस्फोट झाल्याचे सांगण्यात येत आहे. सुरक्षा दल घटनास्थळी पोहोचले असून सर्व जखमींना रुग्णालयात नेण्यात आले आहे. अद्याप कोणत्याही संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. काबूलच्या इमरजेंसी रुग्णालयाने दिलेल्या माहितीनुसार ट्विटरवर स्फोटात जखमी झालेल्या सात वर्षांच्या मुलासह २७ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. रुग्णालयाने याबाबत ट्विटही केले आहे.

नमाजामुळे मशिदीत खूप गर्दी संध्याकाळी उशिरा स्फोट झाला तेव्हा मशिदीमध्ये मगरीबची नमाज अदा केली जात होती. त्यामुळे तेथे मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे मृतांचा आकडा जास्त असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा स्फोट इतका भयानक होता की, स्फोटानंतर मशिदीच्या आजूबाजूच्या इमारतींच्या खिडक्यांच्या काचाही तुटल्या. काबूल पोलिसांचे प्रवक्ते खालिद जद्रान यांनी दिलेल्या माहितीनुसार,

# आरटीओ अधिकाऱ्याच्या घरावर छापा

कोट्यवधीच्या मालमत्तेचं घबाड

।नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।





मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये एका आरटीओ अधिकाऱ्याच्या घरावर छापा टाकण्यात आला. बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी जबलपूर आरटीओ संतोष पाल सिंग यांच्या घरावर छापा टाकला आहे. सिंग यांच्या घरातून उत्पान्नापेक्षा ६५० पट जास्त किमतीची मालमत्ता सापडल्यानंतर तपासात जबलपूरच्या आरटीओकडे १६ लाखांची रोकड आढळून आली आहे. या छापेमारीवेळी घरातून १६ लाखांच्या रोख रकमेसह काळ्या पैशातून मिळवलेल्या अमाप मालमत्तेची कागदपत्रे सापडली आहेत. आर्थिक गुन्हे कक्षाच्या पथकाने काल बुधवारी रात्री बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी प्रादेशिक परिवहन अधिकारी संतोष पाल यांच्या घरावर छापा टाकला. शताब्दीपुरम कॉलनीतील त्यांच्या आलिशान घरावर ईओडब्लूच्या पथकाने कारवाई केली.

EOW SP देवेंद्र प्रताप सिंह यांच्या म्हणण्यानुसार, आरटीओ अधिकारी संचोष पाल आणि त्यांची लिपीक पत्नी रेखा पाल यांच्याकडे प्रचंड संपत्ती असल्याच्या तक्रारी मिळाल्या होत्या, ज्याची पडताळणी निरीक्षक स्वर्णजीत सिंह धामी यांनी केली होती. आरटीओ संतोष पाल यांच्या सेवा कालावधीत वैध स्त्रोतांकडून मिळालेल्या उत्पन्नाच्या तुलनेत त्यांचा खर्च आणि संपादित मालमत्ता ६५० टक्के असल्याचं सांगितलं जात आहे. EOW ला आरटीओच्या पीपी कॉलनी ग्वारीघाट येथील १२४७ चौरस फुटांच्या घराची कागदपत्रे तपासात सापडली आहेत.

# दगडीचाळ २' मध्ये आता 'शकील'ची एंट्री, 'हा' अभिनेता दिसणार खलनायकाच्या भूमिकेत



'शकील'ने मारलेली कमाल एन्ट्री प्रेक्षकांची उत्सुकता अजून वाढवत आहे. मंगलमूर्ती फिल्म्स आणि संगीता अहिर निर्मित, चंद्रकांत कणसे दिग्दर्शित 'दगडी चाळ २' ह्या चित्रपटात 'सूर्या' ,'डॅडी' ,'सोनल' यांच्या कहाणीतला नवीन इक्का म्हणजे 'शकील'. 'सूर्या' आणि 'डॅडी' या दोघांच्या वादात आता 'शकील' कहाणीला काय नवीन वळण आणतोय ते चित्रपट पाहिल्यावरच कळेल. म्हणतात ना वैऱ्याचा वैरी म्हणजे मित्र हीच डोकॅलिटी वापरून 'शकील'ने मारलेली कमाल एन्ट्री प्रेक्षकांची उत्सुकता अजून वाढवत आहे. 'डॅडी' ची ऑफर सूर्या स्वीकारतो की शकील सोबत हात मिळवतो हे गुपित अजून गुलदस्त्यातच आहे. शकील ने दिलेली ऑफर सूर्या स्वीकारेल का? ह्याचे उत्तर येत्या १९ ऑगस्टला चित्रपट पाहिल्यावरच कळणार. 'डॅडी' वर्सेस 'शकील' यांचे वैर चित्रपटाला वेगळाच तडका लावणार असा वाटत आहे. ह्या चित्रपटात अंकुश चौधरी सूर्याच्या, पूजा सावंत सोनलच्या, मकरंद देशपांडे डॅडींच्या भूमिकेत असून शकीलच्या भूमिकेत अभिनेता अशोक समर्थ दिसणार आहेत. दहशद,गँगवॉर,राजकारण ,ॲक्शन आणि लव्हस्टोरी पुन्हा एकदा 'दगडीचाळ २' मध्ये आपल्याला पाहायला मिळणार. निर्मात्या संगीता अहिर म्हणतात," यंदा 'दगडी चाळ २' चित्रपटात गँगवॉरसोबत राजकारणातील ट्विस्ट पाहायला मिळणार आहेत आणि ते ट्विस्ट प्रेक्षकांना आवडतील ही आशा आहे. हा चित्रपट एकाच वेळी वर्ल्डवाइड प्रदर्शित होणार आहे."

# पूजा सावंतला करायचं आहे 'या' लोकप्रिय अभिनेत्रीच्या बायोपिकमध्ये काम

मराठी चित्रपटसृष्टिमध्ये सध्या बरेच वेगवेगळे प्रयोग होत आहेत. त्यापैकीच एक म्हणजे 'दगडी चाळ' हा चित्रपट. डॉन अरुण गवळी यांच्यावर साच्यातला चरित्रपट न बनवता एक वेगळं काल्पनिक कथानक या चित्रपटाच्या पहिल्या भागात पाहायला मिळाले होते. प्रेक्षकांनी या चित्रपटाला चांगलाच प्रतिसाद दिला होता. आता या चित्रपटाचा दूसरा भाग प्रदर्शित होणार आहे. त्यानिमित्ताने 'दगडी चाळ २' चित्रपटाची स्टारकास्ट आणि दिग्दर्शक यांनी लोकसत्ता ऑनलाइनच्या 'डिजिटल अड्डा'वर हजेरी लावली. अभिनेता अंकुश चौधरी, मकरंद देशपांडे, अभिनेत्री पूजा सावंत आणि चंद्रकांत कानसे यांनी यानिमिताने लोकसत्ता ऑनलाईन टीमशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. याच मुलाखतीत पूजा सावंतने 'दगडी चाळ'विषयी आणि त्यात काम करताना तिला आलेल्या अनुभवांविषयी गप्पा मारल्या. पूजा सावंतने भविष्यात तिला कोणत्या अभिनेत्रीचा बायोपिक किंवा वेगळी भूमिका करायला आवडेल याबद्दल खुलासा केला आहे. पूजाला स्वर्गीय अभिनेत्री स्मिता पाटील यांची भूमिका चारित्रपटात साकारायची इच्छा आहे. ही इच्छा तिने 'लोकसत्ता डिजिटल अड्डा'च्या माध्यमातून व्यक्त केली आहे. स्मिता पाटील यांचं एकंदरच व्यक्तिमत्व, त्यांचा अभिनय आणि त्यांचा पडद्यावरचा वावर हेच यमागचं कारण असल्याचं पूजाने स्पष्ट केलं आहे. पूजाने सातवीत असताना जैत रे जैत पाहिला आणि तेव्हापासूनच तिच्या मनात स्मिता पाटील यांनी कायमचं घर केलं होतं. याबरोबरच पूजाला पुन्हा 'लपाछुपी' सारख्या वेगळ्या भयपटात काम करायला आवडेल असंही तिने स्पष्ट केलं आहे. 'लपाछुपी' या चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं आणि पूजाच्या अभिनयाचं कौतुक झालं. त्यानंतर पूजाला अशा प्रकारचे बरेच चित्रपट ऑफर झाले.




## "एक क्षण वाटलं आपणही घुसावं पण..."

# दहीहंडीपूर्वी संतोष जुवेकरची 'ती' पोस्ट चर्चेत

मराठी मालिका, चित्रपटांमधून घराघरात पोहोचलेला अभिनेता म्हणून संतोष जुवेकरला ओळखले जाते. संतोष जुवेकरने 'झेंडा', 'मोरया', 'एक तारा' आणि 'रेगे' यासारख्या मराठी चित्रपटात दमदार भूमिका साकारल्या आहेत. त्याच्या या चित्रपटाला प्रेक्षकांकडूनही खूप चांगली पसंती मिळाली. संतोष जुवेकरचा चाहता वर्ग प्रचंड मोठा आहे. नुकतंच संतोष जुवेकरने श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाला यानिमित्ताने एक पोस्ट शेअर केली आहे. त्याची ही पोस्ट सध्या चांगलीच व्हायरल होताना दिसत आहे.

संतोष जुवेकरने मालिका, चित्रपट, नाटक या सर्व प्लॅटफॉर्मवर आपली जादू दाखवली आहे. संतोष सोशल मीडियावरही तितकाच सक्रीय असतो. नुकतंच संतोष जुवेकरने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात त्याने दहीहंडी पथकाचा व्हिडीओ शेअर केला आहे. यात ते दहीहंडी पथक कशाप्रकारे दहीहंडी निमित्त सराव करत आहे हे पाहायला मिळत आहे. या व्हिडीओला त्याने हटके कॅप्शनही दिले आहे. २ दिवसांवर गोपाळ अष्टमी आलीये. गेली दोन वर्ष हा गोपाळ काला उत्सव साजरा करता नाही आला कारण COVID च संकट तीव्र प्रमाणात होत पण ह्या वर्षी ह्या उत्सवाचा जोर आणि जोश काही औरच असणार आहे सगळेच गोपाळ आणि गोपिका दही हंडी फोडण्याची जोरात तयारी करतायत कस्सून सराव चालाय.

कालच माझे खूप जवळचे मित्र श्री मनोज चव्हाण दादानं मुळे महाराष्ट्रातल गाजलेल्या जय जवान गोविंदा पथक जोगेश्वरी (मुंबई ) ह्यांची PRACTIC बघण्याची संधी मिळाली क्या बात मित्रांनो आणि मैत्रिणींनो जोमात अहात सगळे तुम्ही. एक क्षण वाटलं आपण पण घुसावं पण इतकं सोप्प नाही ते लगेच जाणवलं. माझ्या तुम्हाला आणि सगळ्या गोविंदा पाथकांना खूप खूप शुभेच्छा आणि एक विनंती, मित्रांनो कृपया करून स्वतःची आणि तुमच्या सोबत येणाऱ्या मुलींची आणि लहान मुलांची काळजी घ्या दही हंडी हा सण आहे आपला तो सणा सारखाच साजरा करा त्याची स्पर्धा करू नका. जोश असुदे पण सोबतीला होशही असूदे.



# मराठमोळी अभिनेत्री नेहा जोशी अडकली विवाहबंधनात,

मराठी-हिंदी चित्रपट, नाटक आणि मालिकांमधील एक प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून नेहा जोशीला ओळखले जाते. नुकतंच नेहा जोशी ही विवाहबंधनात अडकली आहे. नेहा जोशीने नुकतंच लगीनगाठ बांधली आहे. याचे तिने अनेक फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. मात्र तिने कोणताही गाजावाजा न करता लग्न केले आहे. नेहा जोशी ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. नुकतंच नेहाने इन्स्टाग्रामवर काही फोटो पोस्ट केले आहे. यातील एका फोटोत नेहाने ही मुंडावळ्या बांधल्या आहेत. यात ती अगदी नववधूच्या वेशात पाहायला मिळत आहे. "माझ्या आयुष्यातील नवीन भूमिका", असे कॅप्शन तिने या फोटोला दिले आहे.



# आघाडीचे दिग्दर्शक अभिनेते गायक नर्तक अशा अनेक भूमिका करणारे नट सचिन पिळगावकर

चित्रपट बनवणे खरं तर एक सर्वात अवघड अशी कला आहे. यात अनेकजण एकत्र येऊन काम करत असतात. तंत्रज्ञ, कलाकार मंडळी या सर्वांना एकत्र बांधून ठेवणारी व्यक्ती म्हणजे दिग्दर्शक. दिग्दर्शकाला खरं तर कॅप्टन ऑफ द शिप असेही आपल्याकडे म्हणतात. चित्रपटसृष्टीत आजवर अनेक महान दिग्दर्शक होऊन गेले आहेत. ज्यांच्या चित्रपटांनी प्रेक्षकांचे केवळ मनोरंजनच केले नाही तर जगण्याची दिशा देऊन गेले. हिंदीत जसे हृषिकेश मुखर्जी, रमेश सिप्पी, बिमल रॉय अशी मंडळी तर मराठीमध्ये राजा परांजपे, व्ही शांताराम, भालजी पेंढारकर अशी मातब्बर मंडळी होती. याच दिग्दर्शकांच्या तालमीत तयार झालेले आजचे आघाडीचे दिग्दर्शक अभिनेते गायक नर्तक अशा अनेक भूमिका करणारे नट म्हणजे सचिन पिळगावकर,



## शॉर्ट न्यूज »

### धवनने गाठले नवीन 'शिखर'



**पुणे। महाईन्यूज**

भारत विरुद्ध झिम्बाब्वे तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून (१८ ऑगस्ट) सुरुवात झाली. हरारे येथील 'हरारे स्पोर्ट्स क्लब' मैदानावर खेळवला गेलेला पहिला सामना भारताने जिंकला आहे. या सामन्यात भारताने यजमान झिम्बाब्वेचा दहा गडी राखून सहज पराभव केला. सलामीवीर शुबमन गिल आणि उपकर्णधार शिखर धवन यांनी १९२ धावांची भागीदारी केली. या दरम्यान शिखरने सलामीवीर म्हणून सहा हजार ५०० धावांचा टप्पा पार केला.

प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने भारतासमोर १९० धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात भारताने ३०.५ षटकांत एकही गडी न गमावता १९२ धावा केल्या. शिखर धवनने नऊ चौकारांच्या मदतीने ११३ चेंडूत नाबाद ८१ धावा केल्या. हे धवनच्या एकदिवसीय कारकिर्दीतील ३८वे अर्धशतक ठरले..

# भारताचा झिम्बाब्वेवर दहा गडी राखून सहज विजय!

## शिखर धवन अन् शुबमन गिलची अर्धशतकं

**। नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

आजपासून (१८ ऑगस्ट) भारत आणि झिम्बाब्वे दरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांची मालिकेला सुरुवात झाली. या मालिकेतील पहिला सामना हरारे येथील 'हरारे स्पोर्ट्स क्लब' मैदानावर खेळवला गेला. या सामन्यात भारताने यजमान झिम्बाब्वेचा दहा गडी राखून सहज पराभव केला. सलामीवीर शुबमन गिल आणि उपकर्णधार शिखर धवन यांनी १९२ धावांची भागीदारी केली. या विजयामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी मिळवली आहे.

प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने भारतासमोर १९० धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात भारताने ३०.५ षटकांत एकही गडी न गमावता १९२ धावा केल्या. यजमानांनी विजयासाठी दिलेले १९० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी शिखर



> या मालिकेतील पहिला सामना हरारे येथील 'हरारे स्पोर्ट्स क्लब' मैदानावर खेळवला गेला. या सामन्यात भारताने यजमान झिम्बाब्वेचा दहा गडी राखून सहज पराभव केला. सलामीवीर शुबमन गिल आणि उपकर्णधार शिखर धवन यांनी १९२ धावांची भागीदारी केली. या विजयामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी मिळवली आहे.

धवन आणि शुबमन गिल सलामीला मैदानात उतरले होते. त्यांनी अजिबात घाई न करता खेळ केला. झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना दोघांची जोडी फोडण्यात अपयश आले. शिखर धवनने ११३ चेंडूत नाबाद ८१ आणि शुबमन गिलने ७२ चेंडूत नाबाद ८२ धावा केल्या. या दरम्यान शिखर धवनने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील सहा हजार ५०० धावांचा टप्पा पार केला. त्यापूर्वी, भारतीय कर्णधार केएल राहुलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेचा संघ ५७ चेंडू शिल्लक असतानाचा सर्वबाद झाला. झिम्बाब्वेने ४०.३ षटकांत १८९ धावा केल्या आहेत. झिम्बाब्वेचा कर्णधार असलेल्या रेगिस चकाब्वाने सर्वाधिक ३५ धावा केल्या. भारताच्यावतीने अक्षर पटेल, दीपक चहर आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. तर, मोहम्मद सिराजने एक गडी बाद केला.

भारताचा हा झिम्बाब्वेविरुद्धचा सलग १३वा विजय आहे. प्रदीर्घ काळानंतर संघात पुनरागमन करून सात षटकांमध्ये तीन गडी बाद करणाऱ्या दीपक चहरला सामनावीरचा पुरस्कार देण्यात आला. मालिकेतील दुसरा सामना २० ऑगस्ट रोजी हरारे येथे होणार आहे.

# रोहित शर्माने दिला पाकिस्तानला इशारा

**27 ऑगस्टपासून संयुक्त अरब अमिरातीमध्ये आशिया चषकाला सुरुवात होणार आहे.**



**।सिनसिनाटी। महाईन्यूज ।**

आशिया चषक स्पर्धा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. २७ ऑगस्टपासून संयुक्त अरब अमिरातीमध्ये आशिया चषकाला सुरुवात होणार आहे. भारतीय संघ २८ ऑगस्टला पाकिस्तानविरुद्ध आपला पहिला सामना खेळणार आहे. त्यापूर्वी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने पाकिस्तानच्या संघाला सावधानतेचा इशारा दिला आहे.

भारतीय क्रिकेट संघ सध्या तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळण्यासाठी झिम्बाब्वे दौऱ्यावर गेला आहे. या मालिकेत भारतीय संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्माला विश्रांती देण्यात आली आहे. या दरम्यान, रोहितने एका कार्यक्रमाला हजेरी लावली. तिथे त्याने आशिया चषकाबद्दल विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. 'यावेळी मागच्या सारख्या चुका होणार नाहीत. आशिया चषकात भारतीय संघ नव्या पद्धतीने खेळणार आहे,' असे रोहित म्हणाला.

पाकिस्तानसोबतच्या सामन्याबाबत रोहित शर्मा म्हणाला, "आम्ही गेल्या वर्षी दुबईत पाकिस्तान विरुद्ध खेळलो. त्या सामन्यात निकाल आमच्या बाजूने लागला नाही. मात्र, यावेळी तसे होणार नाही. यावेळी भारतीय संघ वेगळ्या पद्धतीने क्रिकेट खेळत आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही